# वर्धा जिल्हा क्राईम

**पोलीस स्टेशन गीरड येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी निकेश श्रीकृष्ण गवने वय २७ वर्ष ग. धामनगाव (गवते) आरोपी १) यशवंता उरकुडे २) गेशन उरकुडे दोन्ही रा. धामनगाव (गवते) ता समुद्रपुर जि व आरोपी क१ यास उसने २०० रू दिले होते ते दिलेले पैसे फिर्यादी याने परत मागतले असता दोन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी सोबत बाद केला भाजी कापण्याचे चाकुने व हातावुक्यानी मारहाण करून जख्मी केले तसेच शिवीगाळ करून तुला उचलून बाहेर नेवुन गायब करून टाकीन अशी धमकी दिली अश्या फिर्यादी यांचे तोड़ी रिपोर्ट व मेडीकल सर्टीफिकेट वरून आरोपितांविरुद्ध सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन समुद्रपुर येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फिर्यादी सौ. शालिनी अकेश भोसले वय २० वर्षे रा. गणेशपुर पारधी बेडा ता. समुद्रपुर जिल्हा वर्धा हिन्दी आई ही सकाळी वकच्या चारण्याकरीता गेली असता काही वेळाने फिर्यादीची आई ही रहत रहत घरी आली व तिला हाताला जखम झालेली होती म्हणुन फिर्यादीने तिला विचारले असता यातील आरोपी आकाश प्राण पवार रा. गणेशपुर पारधी बेडा याने बकरीला मारहान करीत असल्याने मी त्यास बकरीला का मारते असे विचारले असता आरोपीने शिवीगाळ करून काडीने हातापायावर मारहान केल्याने तिच्या डावे हातावर जखम झाली. त्यानंतर फिर्यादी व तिची आई सारिका विनोद पवार हिचे घराजवळ हजर असताना नमुद घटना ता. वेळी व स्थळी यातील आरोपी हा हातात काठी घेवून शिवीगाळ करीत आला. व मी दिलेले पैसे मला आताच परत दे असे म्हणून आरोपीने फिर्यादीचे हातापायावर व कमरेवर मारहान केलो. व विट डोक्यावर मारली त्यामुळे डोके फटन जखम झाली अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. सटी वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन समुद्रपुर येथे मारहाणीचा गुन्हा नोंद**

फियांदी आकाश प्राण पवार वय २७ वर्षे रा. गणेशपुर पारधीवेडा ता. समुद्रपुर जिल्हा वर्धा नद घटना ता वेळी व स्थळी सकाळी कन्या चारण्याकरीता येवून जात असता आरोपी क २ हिने फिर्यादीने कन्यामध्ये गारण्यास सोडल्या तेव्हा फिर्यादीने तिच्या कन्या नेण्यास मनाई केली असता आरोपीने शिवीगाळ केली व शिगाळी काकरते तुझ्या कन्या तु घेवून जा असे महटले असता आरोपी क. सौ. शालिनी अकेश भोसले वय २० वर्षे रा. गणेशपुर पारधीदाता समुद्रपुर जिल्हा वर्धा व २) मारिका विनोद पवार रा.गणेशपुर पारा ता. समुद्रपुर जिल्हा वर्धा या फिर्यादीचे जवळ आल्या व दोन्ही आरोपींनी शिवगाही करून आरोपी क. १ हिने फिर्यादीचे डोक्यावर दगड मारला त्यामुळे डोकवाला जखम झाली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ सी वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन सिंधी चोरीचा गुन्हा नोंद**

वैभव पुरुषोत्तम जांबुतकर वय २० वर्ष जात फुलमाळी रा. वार्ड नं. ०१ आमगाव ता.सेलू जि. वर्धा माझ्या बैलाना चारा पाणी करुन आमचे बैल स्लॅपचे घरी मौजा आमगाव शेत शिवारात समृध्दी हायवे बांधले तेव्हा पाऊस सुरु होता मी शेतातील स्लपमध्ये असलेले दार पाऊस सुरु असल्यामुळे मी घाईघाई दार लावायचे विसरून गेलो ते दार उघडेच राहीले व मी माझे घरी आमगाव येथे परत आलो दि. ०९/७/२०२३ रोजी मी सकाळी ०७:००वा दरम्यान शेतात गेलो होतो तेव्हा मी शेतामध्ये असलेल्या सिमेंट विटाने घरामध्ये माझे बैल सोडण्यासाठी व बाहेर काढून चारा पाणी करण्यासाठी गेलो असता माझी बैल जोड़ी दिसली नाही. मी आजुबाजुचे शेतात व गावात बैलांचा शोध घेतला. परंतु माझे बैल कुठेही दिसुन आले नाही माझे दोन्ही बैल पांढ-या रंगाचा शिंगरी शिंगाचे अंदाजे सात वर्ष वयाचे आहे बैलाचे वर्णन १) पांढ-या रंगाचा बैल दोन शिंग असलेला व अंदाजे सात वर्ष वयाचे असून त्याची अंदाजे कि ३५००० /- रु आहे. २) पांढ-या रंगाचा बैल दोन शिंग डोक्याजवळ वाकलेले अंदाजे सात वर्ष वयाचे असून पाठीवर जखम आहे त्याची अंदाजे कि.३५००० /- रु आहे. दोन्ही बैलाची किंमत ७०,०००रूपये कोणी तरी अज्ञात चोरटाने दि. ०८/०७/२०२३ चे रात्री १०.०० वा ते दि.०९/०७/२०२३ चे सकाळी ०७.००चे दरम्याण शेतातील असलेल्या घराच्या उपरुम मधुन खुला बांधलेले बैल कोणीतरी अज्ञात चोरटाने सोडुन नेले आहे. अशा फिर्यादीचे तोंडी वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन हिंगणघाट अपघाताचा गुन्हा नोंद**

हिंगनघाट ते नंदोरी रोड जवळ हिंगनघाट यातील फिर्यादी राम नथ्थूजी सावनकर व त्याचा मित्र मौसा के एम एच ३२ के ००१५ बजाज डिसकव्हर नौ बना नदि वरून आंघोळ करूनपरी परत येत असता स्कूल मारोती व्हॅन क. एमएच ३२ एजे २४०६ चा चालक रा हिंगणघाट तुकडोजी बँक नंदोरी रोडवर समोरून भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने आपले वाहन चालवून फिर्यादी व त्याचा मित्र यास जखमी करण्यास कारणीभूत झाला अशा फिर्यादीचे डि डी बयान वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

**पोलीस स्टेशन वर्धा शहर अपघाताचा गुन्हा नोंद**

दरम्याण मोभूषण देवरावजी मैस्कर वय ३७ वर्ष, व्यवसाय- नौकरी, जात- बौध्द, रा. सुखकर्ता नगरी जय कुमार गोटे यांचे घरी करायाने सावंगी मेघे वर्षा व माझी पत्नी रुतुजा असे आम्ही मोटारसायकल ने सेवाग्राम हॉस्पीटल येथे मित्राकडे भेटण्याकरिता माझी हिरोहोंडा पॅशन प्रो मोटारसायकल क्रमांक श्प ३२ श ४९८९ ने डबलसिट जात असतांना पोलीस अधिक्षक कार्यालय समोरिल स्पीड ब्रेकरवर मी माझे मोटारसायकल चा वेग कमी केला असता मागुन येणारी मोटार सायकल क्र. श्प ३२ श ३५६३ च्या चालकाने आपले ताब्यातील मो.सा भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून माझ्या मो.सा. ला मागुन धडक मारल्याने मी व माझी पत्नि असे आम्ही मो.सा सह रोडवर खाली पडलो त्यामुळे मला हाताला, पायाला व कमरेला मार लागला व माझे पलिला उजव्या पायाचे पोटरीला व उजव्या हाताचे तळहाताला मुका मार लागला व माझे मो.सा से डाव्या बाजुने इंडिकेटर समोरील बफरगार्ड व आरसा व ईतर किरकोळ अंदाजे ३,०००/ रुपयाचे नुकसान झाले. तो मोटारसायकल चालक आपले मित्रासह निघुन गेला. मला व माझ्या पत्नीला मार लागल्याने आम्ही मोटारसायकल चालक क्रमांक श्प ३२ श ३५६३ चालका विरुध्द रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला. -

पोलीस स्टेशन गीरड येथे अपघाताचा गुन्हा नोंद ०९/०७/२३ १२.४० वा. ते १३.१४ वा. चे दरम्यान आरोपी मृतक मोसाक ३४ ३०९० चा चालक नामे वाल्मीक नारायण क्षिरसागर वय ४५ वर्षे रा. खारवट ता. वरोरा जि. चंद्रपुर मृतक वाहन चालक आरोपी हा त्याचे ताब्यातील वाहन क ३४ व ३०९० हिरो होंडा स्प्लेंडर ने समुद्रपुर कडुन गिरड कडे जात असतानामौजा धोंडगाव समोर वळ रस्त्यावर त्याचे ताच्यातील वाहन हयगईने व निष्काळजीपणे चालवून अपघात घडवुन स्वतचे मरणास कारणीभूत ठरला अशा चौकशी अहवालावरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला

**पोलीस स्टेशन पुलगाव येथे अकस्मात मृत्यु प्रकरणी गुन्हा नोंद**

फिर्यादी हा मृतकाचा भावू असून मृतक संदेश पंजाबराव उईके वय २१ रा कवटा रेल्वे ता देवळी, जि. वर्धा हा दारू पिन्याच्या सवयीचा असून त्याला पिलीया आजार झाला होता आजाराला कंटाळून त्याने आत्महत्या केली आहे त्याच्या मरनावर माझा कोनताही संशय नाही अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग क ४७/२०२३ कलम १७४ जाफौ अन्वये दाखल करून तपासात घेतला.

# विदर्भ ट्रॅव्हल्सच्या मालकावरही मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा



## मृतात्म्यांच्या कुटुंबीयांचा बैठकीत एकसूर

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**वर्धा :** समृद्धी महामार्गावर ट्रॅव्हल्सला भीषण अपघात होऊन २५ जणांचा नाहक बळी गेला. यात वर्धा जिल्ह्यातील १४ जणांचा समावेश आहे. दरम्यान, आज रविवार ९ रोजी दुपारी स्थानिक शांती भवनात मृतकांच्या कुटुंबीयांनी बैठक घेत ट्रॅव्हल्स चालकाप्रमाणे मालकावरही मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, असा एकसूर आवळला.

१ जुलै रोजी विदर्भ ट्रॅव्हल्सचा बुलढाणा जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर अपघात झाला. या ट्रॅव्हल्समध्ये सावंगी मेघे चौपाटीवरून पुणे येथे जाण्यासाठी जिल्ह्यातील १४ प्रवाशी बसले होते. या ट्रॅव्हल्सला भीषण अपघात झाला. चालक हा मद्यधूंद अवस्थेत असल्याने हा अपघात घडल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे चालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, या घटनेला मालकही तेवढेच जबाबदार असल्याचा सूर आज रविवारी मृतात्म्यांच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या बैठकीत उगारला.

विदर्भ ट्रॅव्हल्सची मान्यता रद्द करावी, खाजगी वाहन चालकाची एक फेरी झाल्यानंतर त्याला दुसऱ्या फेरीसाठी परवानगी देऊ नये, वाहनाची गती बांधलेली असावी, खाजगी वाहनाचे नियम अधिक कडक करावे, समृद्धी महामार्गावर १०० ते १५० किमीचा प्रवास झाल्यानंतर एक थांबा अनिवार्य करावा, ट्रॅव्हल्सची तिकीट कॅन्सल पॉलिसी देण्यात यावी, ट्रॅव्हल्स मालकावर गुन्हा दाखल करून तत्काळ अटक करावी, नागपूर ते पुणे रेल्वे गाड्यांची संख्या वाढवावी, अपघाताच्या संपूर्ण प्रकरणाची एक चौकशी समिती नेमून पीडितांना न्याय द्यावा, प्रत्येक कुटुंबातील एकाला शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे आदी मागण्यावजा चर्चा या बैठकीत करण्यात आली. यासंदर्भात लवकरच जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांना निवेदन देण्यात येणार असल्याचेही बैठकीत एकमत झाले आहे.

### तुमचे दु:ख चार दिवसांचे

अपघात घडल्यानंतर मृतक प्रथमेश खोडे यांच्या आई निलीमा खोडे यांनी जाब विचारण्यासाठी ट्रॅव्हल्स मालक दरने यांना फोन केला असता तुमचे दु:ख फक्त चार दिवसाचे आहे. माझी संपूर्ण गाडी जळाली, या भाषेत उत्तर देऊन फोन कापला, अशी व्यथाही निलीमा खोडे हिने या बैठकीत मांडली.

### शासनाकडून कुटुंबियांस लवकरच आर्थिक मदत : जिल्हाधिकारी

समृद्धी महामार्गावर खाजगी बसला झालेल्या अपघातातील मृतकांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची घोषणा शासनाच्या वतीने करण्यात आली होती. मदत वितरणासाठी जिल्हा प्रशासनाने सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण केली आहे. ही मदत लवकरच कुटुंबातील कायदेशीर वारसास शासनाकडून दिली जाणार असल्याचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सांगितले. मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत जाहीर केली होती. मदतीसाठी मृतकांच्या नातेवाईकातील कायदेशीर वारसाचे आवश्यक सर्व कागदपत्र बुलडाणा जिल्हा प्रशासनास यापुर्वीच पाठविण्यात आले आहे. प्रशासनाच्या वतीने मदत वितरणासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करण्यात आली आहे. सर्व मृतकांचे मृत्यू प्रमाणपत्र नातेवाईकांना त्वरित उपलब्ध करून देण्यात आले आहे, असे जिल्हा प्रशासनाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# पत्रकारांसाठी आरक्षित विश्रामगृहात २ सूट ताब्यात देण्यात यावे -तालुका पत्रकार संघाची मागणी




**साहसिक वृत्त / १० जुलै**

**शेगाव :** शेगाव विकास आराखडा अंतर्गत संतनगरी शेगाव तयार करण्यात आलेल्या विश्रामगृहातील दोन सूट पत्रकारांसाठी आरक्षित असून सदर दोन फूट हे पत्रकारांच्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी शेगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात नुकतेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील थोतांगे यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन निवेदनाद्वारे ही मागणी केली

शेगाव शहराच्या विकासासाठी शासनाने साडेपाचशे कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर केला व ती कामे पूर्णत्वासही नेली. दरम्यान पत्रकारांना पत्रकार भवन तयार करून द्यावे अशी मागणी तत्कालीन पालकमंत्री तथा कामगार मंत्री भाषण यांच्याकडे करण्यात आली होती. त्यावेळेस तांत्रिक अडचणीमुले ते शक्य न झाल्याने विकास आराखडा निधीतून तयार करण्यात आलेल्या विश्रामगृहातील २ सूट पत्रकारांसाठी कायम आरक्षित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र सदर विश्रामगृहातील सूट पत्रकारांना अद्याप पर्यंत देण्यात आलेले नव्हते. या संदर्भात. शेगाव तालुका पत्रकार संघाच्या वतीने खामगाव येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील थोटांगे यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन या संदर्भात चर्चा करून पत्रकारांसाठी आरक्षित असलेले २ सूट ताब्यात देण्यात यावे असे निवेदन यावेळी सादर करण्यात आले.

यावेळी थोटांगे यांनी कागदपत्रांची पूर्ण तपासणी करून या संदर्भातील अहवाल विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे निश्चित पाठवून कारवाई केली जाईल असे आश्वासन यावेळी शिष्टमंडळाला कार्यकारी अभियंता थोटांगे आणि उपविभागीय अधिकारी पुंडकर यांनी दिले. यावेळी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष फहीम देशमुख कार्याध्यक्ष संजय सोनोने, सचिव नंदू कुलकर्णी, उपाध्यक्ष अनिल उंबरकर, राजेश चौधरी, दिनेश महाजन, धनराज ससाणे, खामगाव प्रेस क्लबचे अध्यक्ष भोसले, प्रशांत देशमुख आदींची यावेळी उपस्थिती होती.

# हिंगणघाट खैरे कुणबी समाज संस्थेच्या वतीने विजयी उमेदवाराचा सत्कार



**साहसिक वृत्त / १० जुलै**

**वर्धा :** वर्धा जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी बँकेच्या सदस्यांची निवडणूक नुकतीच पार पडली त्यात खैरे कुणबी समाजातील बांधव रामदासजी खेकारे व अरुणराव झोटिंग हे सदस्य पदी निवडून आल्याबद्दल त्यांचा हिंगणघाट खैरे कुणबी समाजाच्या वतीने सत्कार समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

स्थानिक तुकडोजी पतसंस्थेच्या सभागृहात आयोजित समारंभात अध्यक्षस्थानी माजी वैद्यकीय अधिकारी व खैरे कुणबी समाज संस्था हिंगणघाट चे अध्यक्ष डॉ.प्रभाकरराव थुटे,तर प्रमुख पाहुणे म्हणून संत तुकडोजी पतसंस्थेचे अध्यक्ष राजेंद्र चाफले , प्रा.ज्ञानेश्वरराव खडसे, एड.सौ. प्रतिभाताई भानखेडे, यांची उपस्थिती होती. रामदासजी खेकारे,अरुणराव झोटिंग या विजयी उमेदवारांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अभिजीत डाखोरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरुणराव झोटिंग यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी समाज संघटीत होणे ही काळाची गरज असुन समाजातील वर्धा जिल्हा परिषद कर्मचारी बॅंकेच्या निवडणूकीत ह्या दोन समाज बांधवांनी विजय प्राप्त केला ही

(उर्वरित पान २ वर)

# जुन्या बस स्टॉप परिसरातील अतिक्रमन धारकांना स्थायी पट्टे व निवासी कुटुंबांना भूखंड द्या

## उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मागणी



**साहसिक वृत्त / १० जुलै**

**हिंगणघाट :** जुना बस स्टॉप परिसरातील अतिक्रमण धारकांना स्थायी पट्टे मिळण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन.

जुना बस स्टॉप परिसरातील अतिक्रमण दि. ६ जुलै २०२३ रोजी हटविण्यात आलेले आहे. या जागेवर गेल्या ४० वर्षापासून आपला उदरनिर्वाह करणारे अनेक छोटे-मोठे व्यवसायीक उघड्यावर पडले आहे. तसेच येथील काही परिवार अनेक वर्षापासून वस्ती करुन राहतात. या अतिक्रमणामुळे तेथील छोट्या-मोठ्या व्यवसायीकांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. तसेच येथे राहणाऱ्या कुटूंबावर बेघर होण्याची पाळी आली आहे.

सदर अतिक्रमीत जागेवर गेल्या ४० वर्षापासून व्यावसायीकांनी आपला व्यवसाय जमवून कसाबसा आपल्या परीवाराचा उदरनिर्वाह करीत होते. परंतू आता अतिक्रमण झाल्यामुळे त्यांचा व त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करावा ? असा प्रश्न तेथील अतिक्रमणधारकांना पडला आहे. सदर अतिक्रमीत व्यवसायीकांना व्यवसाय करण्याकरीता दुसरीकडे स्थायी पट्टे (दुकान) देण्यात यावे व येथील बेघर नागरिकांना सुद्धा राहण्याकरीता स्थायी पट्टे देण्यात यावे. याकडे प्रशासन व शासनाने गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.असे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले यांच्या नेतृत्वात अतिक्रमणधारकांनी जिल्हाधिकारी यांनी मागणी केली आहे

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अतुल वांदिले, सामाजिक न्याय प्रलय तेलंग, जिल्हा सरचिटणीस दशरथ ठाकरे, अमोल बोरकर,माजी नगरसेवक बालाजी गहलोत,गोमाजी मोरे, सुशील घोडे, पंकज भट्ट, राजेश पंपनवार, चिकू पंपनवार, सौ विशाखा पपंनवार, आयशा शेख, गजानन उत्तुलवार, शेख हयाल, मो. एकाज, मो. इल्याज, मो. शाकीर अली, शेख अशपाक, जयुर शेख, सादिक अली, सत्तार भाई, ताज मोहमद, समीर शेख, सुनील खोंड, जाकिर हुसेन, अजय झामरे, अझहर शेख, रशीद पठाण, याकूब खान, शाहीद शेख, उमर शेख आदी उपस्थित होते.

# साहसिक जनशक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान करुन रुग्णाला दिले जीवनदान



**साहसिक वृत्त / १० जुलै**

**वर्धा :** सेवाग्राम येथील कस्तूरबा गांधी रग्णालयात आर्वी येथील एक रग्णाचे लिवर चे ओपरेशन होते त्या साठी त्याला ३ ब्लड डोनर ची अत्यंत आवश्यकता होती. साहसिक जनशक्ति संघटनेला त्यांनी संपर्क केला असता साहसिक जनशक्ति संघटनेच्या कार्यकर्त्यांनी रक्तदान करुन रुगणाला जिवनदान दिले.

# हिंगणघाट पोलीसांची दारुबंदी कायद्यान्वये कारवाई

**साहसिक वृत्त / १० जुलै**

**हिंगणघाट :** अवैधरित्या देशी दारूचे वाहतूक करताना शहर पोलिसांनी नयन दंडवते या आरोपीस ताब्यात घेतले असून त्याच्याकडून तीस हजार रुपयाची देशी दारू तसेच अवैध दारू वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली मोपेड मोटरसायकल असा एकूण १ लाख,१० हजार रुपयांचा मुद्देमाला जप्त केला.

एक इसम काळया रंगाच्या डेस्टिनी मोपेड गाडी क्र. एम एच ३२ ए यू ६८७७ गाडीने देशी दारुची अवैधरित्या वाहतुक करुन शास्त्री वार्ड हिंगणघाट कडे येत आहे, अशी माहिती पोलिसांना मिळाली, सदर माहिती वरून पोउपनि होमकांत मशाखेत्री पो.ना. स्वप्नील जिवने , पो काँ भारत बुटलेकर, मंगेश वाघमारे , राजेन्द्र निवलकर, आशिष नेवारे यांनी शास्त्री वार्ड हिंगणघाट येथे पोहचत आरोपी नयन रंगराव दंडवते(२७) रा.इंदिरा गांधी वार्ड हिंगणघाट याचेवर धाड घातली, यावेळी आरोपीचे ताब्यातुन देशी दारूने भरुन असलेल्या प्लास्टीकच्या ९० एम एल च्या एकुण ३०० शिश्या प्रति शिशी १०० रू प्रमाणे ३० हजार रुपये तसेच काळया रंगाची डेस्टीनी मोपेड गाडी क्र. एम एच ३२ ए यू ६८७७ ताब्यात घेतली, आरोपीची विचारपूस केली असता सदर दारुसाठा नजीकच्या दारोडा येथील सुरज ऊर्फ शेऱ्या पिंपळकर या आरोपीचा असून तो हल्ली हिंगणघाट शहरातील संत कबीर वार्ड येथील रहिवासी आहे. पोलिसांनी आरोपिंविरूध्द अप क्र.८१०/२३ कलम ६५(अ),(ई),७७ (अ), ८३ मदाका सहकलम ३२(१),१८१,१३०/१७७ मो वा का अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक नरूल हसन,अप्पर पोलीस अधिक्षक सागर कवडे, उपविभागीय पोलीस अधिकारी आबुराव सोनवने यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक कैलास पुंडकर याचे निर्देशाप्रमाणे पोउपनि होमकांत मशाखेत्री ,पोहवा जगदीश चव्हान ,पोलीस नाईक स्वप्नील जिवने, पो काँ भारत बुटलेकर, मंगेश वाघमारे , राजेश निवल, आशिष नेवारे यांनी केली .

दै.साहसिक हे वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक रवींद्र नरहरिपंत कोटंबकार,मुद्रक-निरज त्रिपाठी यांनी जनसंग्राम ऑफसेट प्रिंटर्स, आर.टी.रोड गोंडप्लॉट वर्धा येथे मुद्रित करून दै.साहसिक कार्यालय, राधे कॉम्प्लेक्स, अकोला अर्बन बँकेच्यावर, सोशालिस्ट चौक, वर्धा येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी: (07152) 242498, dsahasik@gmail.com RNI NO. MAHMAR / 2007 / 24829 - Postage- WDA / 42 / 08 -10 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.(कुठलाही वाद वर्धा न्यायालयांतर्गत बाध्य राहील.)